ाघान टी-२०
ी कामगिरी करत
ावता दहा गड
ई येथील चेपॉक
यात न्यूझीलंडने
आपला दबदबा
विश्वचषकाच्या
पहिलाच असा
ी एकही गडी न

जिंकून प्रथम
संघाने निर्धारित
। १७३ धावांची
ा उभारली.
कर बाद झाला,
आणि अलिशान
ंख्या सावरली.
ा करत संघाचा
धावांची उपयुक्त
। फळीत मयंक
ोगदान दिले.
दोन गडी बाद
ी फर्ग्यूसन आणि
एक गडी घेतला.




१७४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंडच्या सलामीवीरांनी युएईच्या गोलंदाजांना कोणतीही संधी दिली नाही. टीम सेफर्ट आणि फिन एलन यांनी आक्रमक आणि संयमी खेळाचा उत्कृष्ट समन्वय साधत विक्रमी भागीदारी रचली. सेफर्टने ४२ चेंडूत ८९ धावांची स्फोटक खेळी केली, तर एलनने ८४ धावा करत संघाला विजयापर्यंत सहज पोहोचवले. दोघांनी मिळून १७५ धावांची नाबाद भागीदारी करत अवघ्या १५.२ षटकांत सामना संपवला.

या विजयासह न्यूझीलंड संघाने टी-२० विश्वचषकातील आपली दावेदारी अधिक मजबूत केली असून, युएईसाठी हा पराभव निराशाजनक ठरला.

## ावर डावाने विजय; रणजी करंडक उपांत्य फेरीत धडक

ुमार
२९९
ावर
डाव
णीत
डक
रीत
मना

वात
लने
जल

मारत ३३४ धावांची मोठी आघाडी घेतली.

दुसऱ्या डावात आंध्रचा डाव २४४ धावांत गुंडाळण्यात बंगालच्या गोलंदाजांना यश आले. त्यामुळे सामना डावाने संपुष्टात आला.

पाचव्या दिवशी आंध्रने ३ बाद ६४ धावांवरून खेळ सुरू केला. नितीश कुमार रेड्डीने १४४ चेंडूत सात चौकार आणि दोन षटकारांसह ९० धावांची झुंजार खेळी केली, मात्र अन्य फलंदाजांकडून त्याला अपेक्षित साथ मिळाली नाही. रिकी भुई (३०), त्रिपुराणा विजय (४६) आणि कालिदिंडी राजू (२५) यांनी काही प्रतिकार केला.

बंगालकडून डावखुरा फिरकी गोलंदाज शाहबाज अहमदने उत्कृष्ट मारा करत ७२ धावांत चार बळी घेतले. सूरज सिंधू जयस्वालने दोन, तर आकाश दीप, सुमंता गुप्ता आणि अनुस्तुप मजुमदार यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. आंध्रकडून मोहम्मद शमीने फलंदाजीत ५३ धावा केल्या, मात्र गोलंदाजीत मर्यादित सहभाग नोंदवला.

उपांत्य फेरीत बंगालचा सामना १५ फेब्रुवारी रोजी जम्मू-काश्मीरशी होणार आहे, तर दुसऱ्या उपांत्य सामन्यात कर्नाटक आणि उत्तराखंड आमनेसामने येतील.

ात



-१९
ूच्या
णीय
ामागे
आणि
क्षक,
कांचा

र्यांचे
नीही
याचा
या
ामुळे
ठीवर
ारुण
ाली

## दिव्यांग व्यक्तींसाठी खास निवासी संकल्पना
## ‘स्वनिकेतन’ सादर; परांजपे स्कीम्सची नवी फिल्म चर्चेत

**पुणे** : परांजपे स्कीम्स कन्स्ट्रक्शन लिमिटेड यांनी ‘स्वनिकेतन’साठी आपला पहिला दूरचित्रवाणी जाहिरातपट (TVC) सादर केला. दिव्यांग व्यक्ती आणि त्यांच्या कुटुंबांसाठी विशेषतः तयार करण्यात आलेला हा भारतातील पहिला निवासी समुदाय आहे. परांजपे स्पेशल प्रोजेक्ट्स अंतर्गत विकसित करण्यात आलेल्या स्वनिकेतनमध्ये विचारपूर्वक आखलेली रचना, सुलभता, मानसिक आरोग्याची काळजी आणि दैनंदिन सहकार्य यांचा एकसंध जीवनपरिसर तयार करण्यात आला आहे. या टीव्हीसीमध्ये खऱ्या आयुष्यातील अनुभवांवर आधारित कथांद्वारे प्रकल्पामागील विचार आणि प्रत्यक्ष अनुभव प्रभावीपणे मांडले आहेत. या उपक्रमाशी संबंधित खास भागांच्या स्वरूपात काही



लघु कथाही पुढील काळात सादर केल्या जाणार आहेत, ज्यामुळे विविध प्लॅटफॉर्मवर प्रेक्षकांसमोर या समुदायाचा उद्देश आणि तत्त्वज्ञान अधिक प्रभावीपणे पोहोचवले जाईल.

परांजपे स्कीम्स कन्स्ट्रक्शन लिमिटेड चे व्यवस्थापकीय संचालक श्री. शशांक परांजपे म्हणाले, स्वनिकेतन हा केवळ गृहनिर्माण प्रकल्प नाही, तर काळजी, सन्मान आणि सबलीकरण या मूल्यांवर उभारलेला एक समुदाय आहे. लोकांच्या खऱ्या गरजांना प्रतिसाद देणाऱ्या जागा निर्माण करण्याची आमची दृष्टी नेहमीच राहिली आहे आणि हा प्रकल्प त्या बांधिलकीचे मनापासूनचे प्रतिबिंब आहे. समाजाला परत देण्याच्या भावनेतून लोकांच्या जीवनाला खऱ्या अर्थाने आधार देणारे समुदाय निर्माण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

परांजपे स्कीम्स कन्स्ट्रक्शन लिमिटेड चे बिझनेस डेव्हलपमेंट संचालक श्री. अमित परांजपे म्हणाले, स्वनिकेतनच्या माध्यमातून आम्ही कुटुंबे, स्वयंसेवी संस्था आणि समाज यांच्यासोबत अर्थपूर्ण भागीदारी निर्माण करत आहोत. हा टीव्हीसी म्हणजे या समुदायाची कथा आणि सर्वसमावेशक व सामाजिकदृष्ट्या जबाबदार गृहनिर्माणाची आमची दृष्टी लोकांपर्यंत पोहोचवण्याची सुरुवात आहे.